# 13 डिसेंबर

## आजचा सुविचार :

"आयुष्यात नशीबाचा भाग फ़क्त एक टक्का आणि परिश्रमाचा भाग नव्याण्णव टक्के असतो."

## आजचे पंचांग :

वार – सोमवार

दिनांक : 13 डिसेंबर 2021

तिथी – मार्गशीर्ष

नक्षत्र – रेवती

सुर्योदय – सकाळी 7.05 वाजता

सूर्यास्त – सायंकाळी 6. 01वाजता

## आजचे दिनविशेष :

- जागतिक व्हायोलिन दिवस
- 2001ला आजच्या दिवशीच दिल्लीच्या संसद भवनावर अतिरेक्यांचा हल्ला.
- 1955 ला गोव्याचे माजी मुख्यमंत्री मनोहर पारेकर यांचा जन्म.
- 1996 ला कोफी अन्नान हे संयुक्त राष्ट्राचे महासचिव बनले होते.

## आजचे इंग्लिश शब्द :

1) Sea – समुद्र 2) River - नदी 3) Lake – तळे 4) Well - विहीर

## आजची प्रश्नमंजुषा :

**1) सूर्य कोणत्या दिशेला मावळतो?**

**2) क्रिकेट या खेळामध्ये कोणकोणते साहित्य वापरतात?**

**3) मैदानी खेळांची नावे सांगा.**

**4) प्रकाश संश्लेषण क्रियेसाठी आवश्यक घटक कोणते?**

## बोधकथा :

### राजज्योतिषी

अवंतीनगरीचे राजा बाहुबली यांना राजज्योतिष्याची गरज होती. मंत्रिपरिषदेसमोर त्यांनी ही इच्छा व्यक्त केली. राजज्योतिषाबाबत घोषणा केली जावी आणि पात्र व्यक्तिला निरखुन पारखून नियुक्त केले जावे अशी सर्व मंत्रिगणांनी सर्वसहमतीने ठरवले.
या पदासाठी पात्र उमेदवारांनी मुलाखती द्याव्यात अशी दवंडी दुस-या दिवशी राज्यात पिटवण्यात आली. सर्व उमेदवार ठरलेल्या वेळी दरबारात उपस्थित झाले. राजाने स्वत:च मुलाखती घेण्यास सुरुवात केली. अनेक ज्योतिष्यांनी आपल्या ज्ञानाचे सादरीकरण करण्यास सुरुवात केली परंतु राजाचे समाधान झाले नाही.
अखेरीस तीन ज्योतिषी उरले त्यातील पहिल्या ज्योतिष्याला राजाने विचारले,"तुम्ही भविष्य कसे सांगता" ज्योतिषी म्हणाला,"नक्षत्र पाहून" राजाने दुस-या ज्योतिष्याला हाच प्रश्न विचारला तेव्हा दुसरा ज्योतिषी म्हणाला,"हस्तरेषा पाहून भविष्य सांगतो" राजाला कुणाचीच उत्तरे आवडली नाहीत.
अचानक राजाला तेव्हा आपल्या राज्यातील निर्धन ज्योतिषी विष्णुशर्माची आठवण झाली. विष्णुशर्माला तात्काळ बोलावण्यात आले. राजाने विष्णुशर्माला विचारले," तुम्ही ज्योतिषी असूनसुद्धा या मुलाखतीसाठी का आला नाहीत. तुम्हाला राजज्योतिषी होणे आवडत नाही काय" विष्णुशर्माने सांगितले,"महाराज मी घरी बसून माझ्या स्वत:च्या पत्रिकेचा अभ्यास केला व माझ्या अभ्यासानुसार या पदावर मीच नियुक्त होणार आहे. तुम्ही मला निमंत्रण पाठवून मला बोलावून घ्याल हे मला माझ्या अभ्यासातून आधीच कळाले होते. त्यामुळे मी या पदासाठी मुलाखत देण्यास आलो नाही." राजाला विष्णुशर्माची अभ्यासू वृत्ती व त्याचा आत्मविश्वास या दोन्हीचा अभिमान वाटून त्याने विष्णुशर्माला राजज्योतिषी म्हणून नियुक्त केले.